# अहवाल

## शासकीय अध्यापक महाविद्‌यालय, पनवेल

**विषय - "महिला तक्रार निवारण समिती अंतर्गत व्याख्यानाचे आयोजन"**

दिनांक: १३ फेब्रुवारी २०२५

स्थळ: सरस्वती कक्ष

वेळ: सायंकाळी ४.०० ते ५.००

शासकीय अध्यापक महाविद्‌यालय, पनवेल येथे "महिला तक्रार निवारण समिती अंतर्गत व्याख्यानाचे आयोजन" करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख उद्‌दिष्ट महिलांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे आणि तक्रार निवारण प्रक्रियेबाबत माहिती देणे हे होते.

कार्यक्रमाची सुरुवात महाविद्‌यालयाच्या प्राचार्य, मान्यवर व्याख्यात्यांनी आणि उपस्थित प्राध्यापकांच्या स्वागताने झाली. त्यानंतर मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा आणि उद्‌दिष्टे स्पष्ट केली प्रमुख व्याख्यात्या श्रीमती सोनी गुप्ता (महिलांचे आरोग्य) यांनी महिलांच्या आरोग्यविषयक विविध समस्या, मानसिक आणि शारीरिक आरोग्याची काळजी घेण्याचे उपाय यावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी महिलांना आरोग्यासंबंधी स्वच्छतेचे महत्त्व, योग्य आहार आणि नियमित आरोग्य तपासणी याविषयी माहिती दिली. महिलांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी, मानसिक आरोग्याचे महत्त्व आणि तणाव व्यवस्थापन महिला तक्रार निवारण समितीची भूमिका आणि कार्यपद्धतीकार्यक्रमाच्या अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून महिलांच्या सशक्तीकरणाच्या दृष्टीने अशा उपक्रमांचे महत्त्व स्पष्ट केले. त्यानंतर श्रीमती स्वाती घोरपडे यांनी आभारप्रदर्शन केले. सूत्रसंचालनाची जबाबदारी श्रीमती. रूणाली कचरे यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडली. तसेच श्री. आकाश राठोड यांनी कार्यक्रमातील महत्त्वपूर्ण क्षण छायाचित्र आणि व्हिडिओ स्वरूपात टिपले. या व्याख्यानामुळे विद्‌यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना महिलांच्या आरोग्यविषयी आणि तक्रार निवारण प्रक्रियेविषयी उपयुक्त माहिती मिळाली. उपस्थितांनी या विषयावर आपली मते मांडली आणि उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.




कार्यक्रम अध्यक्षा डॉ.रमा भोसले मॅडम यांचे स्वागत करताना प्रा.डॉ नीलिमा मोरे




कार्यक्रमाच्या अध्यक्षा आलेल्या प्रमूख अतिथी श्रीमती. सोनी गुप्ताजी यांचे स्वागत करताना




कार्यक्रमांची प्रास्तविक मांडताना आपल्या महाविृयालयांचे प्रा. डॉ. नीलिमा मोरे मॅडम




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना श्रीमती. रुणाली अशोक कचरे.




कार्यक्रमाचे आभार प्रकटीकरण करताना श्रीमती. स्वाती घोरपडे




प्रमूख व्याख्याते सह प्रथम वर्ष बी.एड विद्यार्थीनी वर्ग